# <u>प्रसिद्धीपत्रक</u>

## श्री. रमेश रंगनाथ चव्हाण, वय ५१ वर्षे, व्यवसाय तलाठी, तलाठी सजा कार्यालय कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना लाच घेतांना अटक

| | |
|---|---|
| आरोपीचे नाव, हुद्दा, पत्ता | श्री. रमेश रंगनाथ चव्हाण, वय ५१ वर्षे, व्यवसाय तलाठी, तलाठी सजा कार्यालय कन्नड, जिल्हा औरंगाबाद<br>रा. गणेश कॉलनी, कन्नड, जिल्हा औरंगाबाद. |
| किती लाच स्विकारली | १०,०००/- |
| सापळा अधिकारी यांचे नाव | श्री. सतीश भामरे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि., औरंगाबाद |
| लाचमागणीचे कारण | तक्रारदार यांचे घराची फेरफार नोंद करून, माझे नाव अधिकार अभिलेखात दाखल करून, तक्रारदार यांच्या नावाचा सातबारा देण्यासाठी |

यातील तक्रारदार हे मुळ कन्नड येथील राहणार असून, कन्नड येथे त्यांचे स्वतः च्या नावाचे श्रीरामकॉलनी, कन्नड जिल्हा औरंगाबाद येथे घर आहे. सदर घर विक्री करण्यासाठी त्यांना त्यांचे घराचा सातबारा आवश्यक असल्याने, त्यांनी तलाठी सजा कार्यालय, कन्नड जिल्हा औरंगाबाद येथे रितसर अर्ज दिला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने तलाठी सजा कार्यालय कन्नड येथील तलाठी श्री. आर. आर. चव्हाण यांनी तक्रारदार यांच्याकडे ५०,०००/ रु लाचेची मागणी तक्रारदार यांच्याकडे केली. परंतू तक्रारदार यांची तलाठी श्री. चव्हाण यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तशी तक्रार दिली.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने आज दि. ०२/०१/२०१९ रोजी पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, तलाठी श्री. चव्हाण, तलाठी सजा कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांनी ६०,०००/- रुपये लाचेची मागणी करून, तडजोडी अंती ५०,०००/- रु स्विकारण्याचे मान्य करून, लाचेचा पहिला हप्ता म्हणून १०,०००/- रु स्विकारण्याचे मान्य केले.

त्यावरून आज दि.०२/०१/२०१९ रोजी लाचेच्या सापळ्याचे आयोजन केले असता, पंचासमक्ष श्री. चव्हाण, तलाठी, तलाठी सजा कार्यालय कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांनी लाचेचा पहिला हप्ता म्हणुन १०,०००/- रु स्विकारल्या नंतर त्यांना पडकण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे कन्नड शहर, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

Dy. S.P.

(सतीश भामरे)
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.

Scanned by CamScanner